**<u>सेवाप्रवेश नियम</u>**
**पदोन्नतीसाठीची पूर्व अट म्हणून निम्न संवर्गात/**
**सेवेत/श्रेणीत किमान सेवेसंबंधीची अट विहित करणे.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही १०८८/१०९/प्र.क्र.१/८८/बारा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ४.९.१९९०.

पहा : १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : एसआरव्ही १२७७/१२, दि.१४ ऑक्टोबर, १९७७,
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : एसआरव्ही १२७७/१२, दि. ३ सप्टेंबर, १९७९,
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : एसआरव्ही १०८०/१२, दि. २० जुलै, १९८१,
४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांकः एसआरव्ही १०८८/१०९/१२,दि.२५.८.१९८८,
५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : एसआरव्ही १०८८/१०९/१२, दि.३१ मे, १९८९.

**<u>परिपत्रक</u>** :

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही १०८८/१०९/१२, दि.२५.८.१९८८ अन्वये वर्ग ३ पासून वर्ग १ मधील दुसऱ्या पदोन्नतीपर्यंतच्या पदांवर पदोन्नती करताना पदोन्नतीसाठी पूर्वअट म्हणून निम्न पदावर किमान ३ वर्षाच्या सेवेची अट विहित करण्यात आलेली आहे. सदर अट अधिक सुस्पष्ट व्हावी व त्यानुसार कार्यवाही करणे सहज शक्य व्हावे म्हणून उपरोक्त दि.२५.८.१९८८ च्या परिपत्रकातील परिच्छेद क.१ मधील ९ व्या ओळीत 'करतानाही' आणि 'निम्न' या दोन शब्दांच्या मध्ये 'निकटतम' हा शब्द अंतर्भूत करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे त्याच परिच्छेदातील 'तसेच आंतरश्रेणीय पदोन्नतीसाठी निकटतम निम्न पदावर ३ वर्षांच्या किमान सेवेची अट विहित करण्यात यावी' हे शेवटचे वाक्य वगळण्यात येत आहे.

२. या सुधारणेमुळे आता वर्ग ३ पासून वर्ग १ मधील दुसऱ्या पदोन्नतीपर्यंतच्या पदांवर आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर तीन वर्षांच्या किमान सेवेची अट पदोन्नतीसाठीची पूर्वअट म्हणून राहील व प्रत्येक पदोन्नतीसाठी आवश्यक असलेला सदरहू अनुभवाचा कालावधी हा संबंधित सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार नियमित पद्धतीने केलेल्या नियुक्तीनंतरचा असला पाहिजे हे स्पष्ट करण्यात येत आहे.

३. संदर्भाकित दि.२५.८.१९८८ च्या परिपत्रकात स्पष्ट केल्याप्रमाणे मंत्रालयाच्या विविध विभागांनी आपापल्या कक्षेतील पदांच्यासंदर्भात वरील तत्व संबंधित सेवाप्रवेश नियमांत अंतर्भूत करण्याची कार्यवाही करावी आणि अशा प्रकारे कार्यवाही पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत पदोन्नती करताना या तत्वाचा अवलंब करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भा.म.भणगे
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
मंत्रालयाचे सर्व विभाग,
मंत्रालयाच्या विविध विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख.

E:\GR\4.9.1990